# हॉटेल असोसिएशनचे आजपासून अधिवेशन

म. टा. प्रतिनिधी, नाशिक

हॉटेल्स ॲण्ड रेस्तरॉ असोसिएशन ऑफ वेस्टर्न इंडिया या संस्थेचे १९ वे तीन दिवसीय विभागीय अधिवेशन आज (दि. ७) पासून आयोजित करण्यात आले आहे. त्याचे उद्घाटन भारतीय क्रिकेट संघाचे माजी कर्णधार दिलीप वेंगसरकर यांच्या हस्ते सायंकाळी सहा वाजता हॉटेल रॅडिसन ब्लूमध्ये होईल, अशी माहिती असोसिएशनचे अध्यक्ष प्रदीप शेट्टी यांनी दिली.

सुमारे तीन वर्षांच्या खंडानंतर हे अधिवेशन होत असून, त्यात अनेक हॉटेल्स व रेस्तरॉचे प्रतिनिधी, शासकीय अधिकारी, गुंतवणूकदार व उद्योग क्षेत्रातील मान्यवर सहभागी होणार आहेत. 'हियर टू विन' या थीमवर आधारित या अधिवेशनात हॉटेल व रेस्तरॉ व्यावसायिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.